| पालक मेळावा अहवाल | दि. २७।७।२०२३ |
| --- | --- |

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील पालक शिक्षक मेळाव्याचे आयोजन गुरुवार दिनांक २७।७।२०२३ रोजी करण्यात आले होते. सर्वप्रथम उपस्थितांचे स्वागत श्रीमती आहेर एस.एस मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अध्यक्ष निवड श्रीम. कड रपी मॅडम यांनी केली. पालक मेळाव्याच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जागृती शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री लक्ष्मणराव शंकरराव टोपे यांची निवड करण्यात आली होती. या अध्यक्ष पदाच्या निवडीस श्रीम. अहेर मॅडम यांनी सर्वानुमते अनुमोदन दिले.

* <u>सभेतील विषय पुढीलप्रमाणे</u> :-

1) <u>पालक शिक्षक संघ कार्यकारिणी निवड</u> :-

श्रीम कड मॅडम यांनी विविध समित्यांची माहिती पालकांना सांगितली तसेच समित्यांच्या रचनेची माहिती देण्यात आली. त्यानंतर सर्वानुमते कार्यकारिणी निवडली.

२) <u>शिक्षकांची ओळख</u> :- सर्व शिक्षकांनी आपली ओळख पालकांना करुन दिली तसेच कोणत्या वर्गासाठी कोणते शिक्षक आहे याची पालकांना माहिती सांगितली.

३) <u>विद्यार्थ्यांचा पट</u> :- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये शाळेत एकूण वर्गवार ॲडमिशन झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या यांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांचा पट पुढीलप्रमाणे :- Nur - 4, Jr.kg - 17 Sr.kg - 28 1st 29 2nd 24 3rd 27 4th - 14

४) <u>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी फी मान्यता घेण्याबाबत</u> :-

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी जी फी आहे ती गेल्यावर्षी इतकीच असून म्हणजे १०,००० रुपये असून त्या फी मधून आपण टर्म फी 1000 रुपये ट्युशन फी 7000 रुपये व साहित्य फी २००० रुपये अशी एकूण १०००० रुपये इतकी फी राहील. साहित्य फी मधून आपण विद्यार्थ्यांना ड्रेस (शाळेचा गणवेश) बॅग टिफीन बॅग शुज सॉक्स व शालेय पाठ्यपुस्तके शाळेतुन दिली जातील. यांची माहिती पालकांना दिली.

5) <u>आधारकार्ड अपडेट करणे</u> :

ज्या विद्यार्थ्यांचे इयत्ता १ ली मध्ये ॲडमिशन झाले आहे. त्या विद्यार्थ्यांना ज्यांचे आधारकार्ड काढले आहेत त्यांना

Scanned with OKEN Scanner

अपडेट करण्यास सांगितले व ज्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढले नाही त्यांना ते काढण्यास सांगितले.

७) <u>ऐनवेळेचे विषय</u> :-

यामध्ये विद्यार्थ्यांच्या शिस्त विषयी चर्चा करण्यात आली. कडू मॅडम यांनी विद्यार्थ्यांच्या अडचणी मांडल्या व शालेय शिस्तीची माहिती दिली. शालेय उपक्रम व विद्यार्थ्यांच्या अडचणीबाबत चर्चा करून सर्वांना विद्यार्थ्यांच्या अडचणीकडे लक्ष देण्याचे आवाहन केले. आलेल्या तक्रारी जबाबदारीने सोडविल्या जातील असे स्पष्ट केले.

मान्यवर यामधून जागृती शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री. नामदेव टोपे व जागृती शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री अंबादास टोपे यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले तसेच भैरवनाथ विद्यालयाचे प्राचार्य मा. श्री व्यवहारे सर यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले.

त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री लक्ष्मणराव शंकरराव टोपे साहेब यांनी आपले विचार व्यक्त केले. पालकांच्या उपस्थितीबद्दल अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या शेवटी श्रीम. अहेर मॅडम यांनी आभार व्यक्त केले.

अशाप्रकारे खेळीमेळीच्या वातावरणात चहापान घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

पालक शिक्षक संघ
(सचिव)

Principal
L.S.T.English Medium School
Waki Bk.Tal.Khed,Dist.Pune